# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९

फोन नं).०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०

(Website - www.sai.org.in, Email – purchase@sai.org.in)


## जाहीर ई-निविदा

श्री साईबाबा संस्थानचे लाडू निर्मिती व कॅन्टीन विभागांसाठी सन २०१८-१९ करिता माहे जुलै ते सप्टेंबर २०१८, ऑक्टोबर ते डिसेंबर २०१८ व जानेवारी ते मार्च-२०१९ अशा ३ टप्प्यांमध्ये साखर M-30 खरेदीकामी नामांकित पुरवठाधारक, वितरक, उत्पादक यांचेकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

**निविदा किंमत** :- रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार मात्र)

**बयाणा रक्कम** :- रु.२,५०,०००/- (रुपये दोन लाख पन्नास हजार मात्र)

१. ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींग व अपलोडींगसाठी दि.22/05/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.१२/०६/२०१८ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. दिनांक.१३/०६/२०१८ ते दिनांक.१४/०६/२०१८ या कालावधीत सायं.०५.०० वा.पर्यंत (रविवार खेरीज) निविदेमध्ये दर भरलेल्या साखरेचे नमुने शिर्डी कार्यालयात समक्ष सादर करावेत.

४. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि. १५/०६/२०१८ रोजी उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा अंशत: / पुर्णपणे स्वीकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

(श्रीमती.रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

# SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI

At/post-Shirdi, Tal-Rahata, Dist- Ahmednagar- 423109
Phone No.(02423) 258500/771/772, Fax No.02423-258870
(Website-www.sai.org.in, E-mail – purchase@sai.org.in)

---

## E-TENDER NOTICE

E-tenders are invited from reputed dealers/suppliers/processors for the supply of Sugar M-30 for our Ladu Nirmiti and Canteen Department for the year 2018-19 in three parts i.e. July to September-2018, October to December-2018 & January to March-2019.

**Cost of Tender :-** Rs.25,000/- (Rs.Twenty Five Thousand Only)

**E.M.Deposit :-** Rs.2,50,000/-(Rs.Two Lacs Fifty Thousand Only)

1. E-Tender & its terms and conditions are available on www.mahatenders.gov.in.
2. The E-Tender is available for Downloading & Uploading from Date: 22/05/2018 11.00 AM to 12/06/2018 up to 5 PM.
3. The sample of Sugar is to be submitted from Date: 13/06/2018 to 14/06/2018 up to 5.00 PM. at our Shirdi office on all working days except Sunday.
4. If possible Technical Bids will be opened on Date: 15/06/2018.

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi reserves the right to accept partly/fully any tender or reject all tenders without assigning any reason thereof.

**(Smt.Rubal Agarwal, I.A.S.)**
**CHIEF EXECUTIVE OFFICER**
**Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi**

10/05

Scanned with CamScanner

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

शिरडी ४२३ १०९.
तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर

दुरध्वनी क्रमांक (९५-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,
फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७०
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय -** साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३

## श्री साईबाबा संस्थानचे लाडू निर्मिती व कॅन्टीन विभागांसाठी M-30 साखर पुरविणेबाबत ई-निविदा

## सन २०१८-१९

## (माहे जुलै ते सप्टेंबर २०१८, ऑक्टोबर ते डिसेंबर २०१८ व जानेवारी ते मार्च-२०१९ अखेर)

Scanned with CamScanner

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## निविदाधारकांसाठी सूचना

I. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष व इतर शर्ती/अटींचा तपशील सोबत दिलेला आहे.

II. **ई-निविदा फी व बयाणा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन भरावयाची आहे.** पूर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत ऑनलाईन सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे.

III. सदर निविदा दि. 22 / 05 /२०१८ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि. १२ / ०६ /२०१८ सायं. ०५.०० वा.पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

IV. ई-निविदा दर भरलेल्या साखरेचे नमुने दि. १३ / ०६ /२०१८ ते दि. १४ / ०६ /२०१८ अखेर सायं. ५.०० वाजेपर्यंत (रविवारखेरीज) संस्थानचे शिर्डी येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावेत.

V. **ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.**

VI. शक्य झाल्यास दि. १५ / ०६ /२०१८ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. निविदेसोबत Online सादर केलेली कागदपत्रे मागणीप्रमाणे असल्यासच Commercial Bid उघडणेत येईल अन्यथा **निविदा विचारात घेतली जाणार नाही.**

VII. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमध्ये सादर करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

VIII. कोणतीही निविदा अंशतः/पुर्णतः स्विकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

**(श्रीमती.रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

8/5 10/05



Scanned with CamScanner

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
**शिर्डी– ४२३ १०९. तालुका- राहाता, जिल्हा-अहमदनगर**

## निविदेच्या शर्ती व अटी

१. पुरवठा करावयाचे साखरेचा अंदाजे तपशिल सोबतचे परिशिष्टात (BOQ मध्ये) दिलेला आहे. त्यात दर नमुद करुन निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२. निविदाधारकाने निविदा फी रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार मात्र) व बयाणा रक्कम रु.२,५०,०००/- (रुपये दोन लाख पंचवीस हजार मात्र) www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन भरावयाची आहे.

३. **एकाच निविदाधारकाला BOQ मधील A, B, व C या तीनही भागासाठी ई-निविदा भरावयाची असेल तर त्यासाठी एकत्रित अगर एक किंवा दोन भागासाठी निविदा फी रु.२५,०००/- व बयाणा रक्कम रु.२,५०,०००/- राहिल.**

४. सदर निविदा भरणेकामी जुलै-२०१८ ते सप्टेंबर-२०१८, ऑक्टोंबर-२०१८ ते डिसेंबर-२०१८ व जानेवारी-२०१९ ते मार्च-२०१९ अशा प्रत्येक तीन महिन्याचे कालावधीसाठी BOQ चे तीन भाग करण्यात आले आहेत. निविदाधारकास निविदा भरणेकामी वरील नमुद कालावधीप्रमाणे तीन BOQ मध्ये दर भरावे लागतील. प्रत्येक भागामध्ये भरलेले दरांचा स्वतंत्र विचार करुन अंतीम निर्णय घेण्यात येईल. त्याप्रमाणे करारनामा व पुरवठा आदेश रकमेच्या ३ टक्के सुरक्षा अनामत रक्कम त्वरीत भरावी लागेल.

५. दुकान नोंदणी दाखला, GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt, FSSAI परवाना, पॅन कार्ड, सन २०१६-१७ चे वार्षिक उलाढालीबद्दल सी.ए.यांचे प्रमाणपत्र सोबत दिलेल्या नमुन्यामध्ये अगर सीए यांचे लेटरहेडवर घेऊन सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत.

६. **निविदाधारकांची सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाची वार्षिक उलाढाल किमान रु.१ कोटी ९० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असणे गरजेचे आहे. याचा निविदाधारकाने निविदा भरताना विचार करावा.**

७. **साखरेचे नमुने देतांना १ कि.ग्रॅ. वजनाचे नमुने कापडी पिशवीमध्ये स्वाक्षरीसह सिलबंद करुन संस्थानचे खरेदी विभागात दयावयाचे आहेत. त्यावर आपले फर्मचे नांव लिहिलेले असावे. नमुने नसलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही. दिलेले नमुने कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाहीत. तसेच एकदा नमुना सादर केलेनंतर बदलता येणार नाही.**

८. संस्थानने BOQ मध्ये मागणी केलेल्या वर्णनाप्रमाणे साखरेसाठी उच्चतम दर्जाचा एकच नमुना सादर करावा. साखरेचे २ किंवा अधिक नमुने सादर करु नये. तसे केल्यास एकाच नमुन्याचा विचार केला जाईल.

९. साखरेचे मागणीनुसार प्रती क्विंटलचे शिर्डी संस्थानचे भांडार विभागात पोहोचचे जीएसटीसह सर्व खर्च समावेशक दर द्यावेत. सेस, मार्केट सेस, मापाई, सेल्स टॅक्स/इतर टॅक्स, जकात, वाहतुक व वाराई खर्च वगैरेची जादा रक्कम वेगळी लावता येणार नाही. **माल उतरविण्याची वाराई पुरवठाधारकास द्यावी लागेल.**

१०. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत मालाचा पुरवठा करावयाची हमी म्हणून मंजुर मालाच्या एकुण रक्कमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या साखरेचा पुरवठा केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

...२...

Scanned with CamScanner

११. निविदा मंजुर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम त्वरित डी.डी.व्दारे/रोखीने भरावी लागेल. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. **करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल. त्यानंतरच पुरवठा आदेश देण्यात येईल.**

१२. मान्य झालेल्या नमुन्याप्रमाणे व दर्जाप्रमाणेच साखर पुरवावी लागेल. वेगळ्या प्रकारची साखर स्विकारली जाणार नाही. अशी साखर पुरवठा झाल्यास ती स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. ती न नेल्यास, त्या साखरेची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

**१३. निविदाधारकाने पुरविलेली साखर संस्थानने नाकारली व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून साखर खरेदी करावी लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर मालाच्या बिलातुन वसुल केली जाईल.**

१४. साखरेचे पॅकिंग निव्वळ ५० किलो वजनाचे (बारदान व्यतिरिक्त) असावे. ग्रॅममधील वजन बिलासाठी ग्राह्य धरले जाणार नाही.

१५. पुरविलेल्या साखरेचे बिल तपासणी करुन, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल. सदर पुरवठयापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. आवश्यकतेनुसार जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा/NABL/केंद्र शासनाच्या/राज्यशासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून मालाची तपासणी करणेत येईल.

१६. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

**१७. संस्थानने निविदेमध्ये नमूद केलेली एकूण साखरेची मागणी ही अंदाजे नमूद केलेली आहे. शिर्डी येथे दर्शनासाठी भेट देणा-या साईभक्तांच्या गर्दीवर प्रसाद लाडू व बुंदी सेवा अवलंबुन असलेमुळे प्रत्येक महिन्यात अगर कमी जास्त मुदतीत अगर संस्थानचे गरजेनुसार साखरेची मागणी केली जाईल. एकदम सर्व साखर खरेदी केली जाणार नाही. संस्थानचे खरेदी चलनाप्रमाणे वेळोवेळी गरजेनुसार साखर पुरवावी लागेल. तसेच मागणीपेक्षा जादा साखर पुरविलेस ती स्विकारली जाणार नाही.**

**१८. संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे निविदा/करारनामा कालावधीत अगर त्यानंतरही पुढील वर्षाची खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजुर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा साखरेची मागणी संस्थानकडून झाल्यास त्या साखरेचा पुरवठा मान्य दरानेच करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमुद केलेली सर्व साखर खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.**

१९. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणेच साखरेचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच साखरेचे बिल सादर करावे.

२०. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कपाती बिलातून करण्यात येतील.

२१. पुरवठा आदेशातील पुरवठा केलेल्या साखरेमध्ये भेसळ अथवा कमी प्रतीची आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सबंधीत पुरवठाधारकाची राहील.



Scanned with CamScanner

२२. पुरवठादाराचे/ संस्थेचे आवश्यकता वाटल्यास Vendor Audit केले जाईल.

२३. साखर पॅकिंगसाठी वापरण्यात येणारे मटेरीअल Food grade Quality चे असावे.

**२४. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.**

२५. संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या साखरेचे रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास सदर साखर बदलून द्यावी लागेल. त्यादरम्यान संस्थानला बाहेरुन साखर विकत घ्यावी लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेले साखरेच्या किंमतीच्या २ ते ५ टक्के दंड देय असलेल्या कुठल्याही मालाचे बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

२६. काही वेळेस लॅब रिपोर्ट येण्यासाठी विलंब होतो अशा वेळी जर आलेला माल वापरला गेला व नंतर लॅब रिपोर्ट FSSAI Standard प्रमाणे न आल्यास त्या लॉटमधील मालाच्या किंमतीच्या २ ते ५ टक्केपर्यंत दंड आकारला जाईल.

२७. एकाच प्रकारच्या मालाचा लॅब रिपोर्ट सलग तीन वेळेस FSSAI Standards नुसार न आलेस सदर निविदाधारकांस संस्थानकडून उचित कारवाई करणेबाबत निर्णय घेतला जाईल. याबाबत तक्रारदाराची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

**२८. पुरवठा करीत असलेल्या साखरेची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randomly Sample घेऊन साखर स्विकारली जाते. तथापी साखर स्विकारलेनंतरही एखादा लॉट, गोणी अगर काही खराब साखर आढळल्यास ती साखर स्वखर्चाने बदलून द्यावी लागेल.**

२९. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी निविदा भरण्याचे अंतिम तारखेपासून १२० दिवसांचा राहील.

३०. निविदाधारकाने साखरेचा नमुना देताना नमुना निवडीसाठी असा नमुना द्यावा की पुरवठा आदेश मिळालेनंतर त्याच नमुन्याच्या साखरेचा संस्थानला पुरवठा होईल.

३१. पुरवठा आदेशाप्रमाणे संस्थानकडे साखर पाठविल्यानंतर प्रथम दक्षता पथकाकडून/संस्थान नियुक्त अधिका-यांकडून साखरेची तपासणी केली जाईल. त्यांना योग्य वाटल्यास साखर स्विकारण्यात येईल. पुरवठाधारकांनी दिलेल्या नमुन्याप्रमाणे साखर पुरविण्याची दक्षता घ्यावी.

३२. वरीलप्रमाणे साखरेची तपासणी करुन ताब्यात घेतलेल्या साखरेचे बील, बील संस्थानकडे सादर केलेपासून ३० दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहिल.

३३. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

३४. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात माल पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या मालाच्या ५० टक्के मालाचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण मालाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.



Scanned with CamScanner

## आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-

३५. साखर पुरविणेचा आदेश दुरध्वनीवरुन अथवा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसांचे आत साखरेचा पुरवठा न झाल्यास, अगर योग्य प्रतीचा नसल्यामुळे साखर नाकारली गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितकी किंवा दिलेल्या आदेशा इतकी साखर दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या साखरेसाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई निविदाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या साखरेच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

३६. निविदेतील मंजुर दराने व निवडलेल्या नमुन्याप्रमाणे साखर पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही. अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने साखर पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा साखर पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन साखर खरेदी करावी लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल.

३७. निविदा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक मालाचा पुरवठा करु शकला नाही व तसे निविदाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल.

३८. पुरवठा आदेशातील साखर पुरवठा चलनाप्रमाणे मुदतीत पुरविली नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

अ) पुरवठा आदेशातील साखरेची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास पुरवठा न केलेल्या साखरेच्या किंमतीच्या प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत

आ) पुरवठा आदेशातील साखरेची किंमत रु.२.०० लाखापेक्षा जास्त असल्यास पुरवठा न केलेल्या साखरेच्या किंमतीच्या प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत

३९. संस्थान लॅबचा रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास केंद्र शासनाच्या मुंबई येथील शासकीय/NABL लॅबमध्ये भांडार विभागाकडून तेच सॅम्पल तपासणी करुन त्याची पुर्न खात्री करण्यात येईल. सदर लॅबचा तपासणी अहवाल अंतिम समजन्यात येईल.

Rubal

(श्रीमती.रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

15/06

## निविदाधारकाबाबत माहिती

| | | |
|---|---|---|
| १. | फर्मचे नांव- | ------------------------------------------------ |
| २. | पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- | ------------------------------------------------ |
| ३. | दूरध्वनी क्रमांक- | ------------------------------------------------ |
| | ऑफीस | ------------------------------------------------ |
| | दुकान | ------------------------------------------------ |
| | निवास | ------------------------------------------------ |
| | मोबाईल नंबर | ------------------------------------------------ |
| | फॅक्स नंबर | ------------------------------------------------ |
| | ई –मेल | ------------------------------------------------ |
| ४. | संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- | ------------------------------------------------ |
| | दूरध्वनी क्रमांक- | ------------------------------------------------ |
| ५. | मालकाचे/भागीदारांची नावे- १. | ------------------------------------------------ |
| | २. | ------------------------------------------------ |

६. संस्थानकडून रक्कम आदा करणेसाठी दयावयाचा तपशील

| | |
|---|---|
| १. बॅंकेचे नांव व शाखा ठिकाण | ------------------------------------------------ |
| २. बॅंक खात्याचा प्रकार | ------------------------------------------------ |
| ३. बॅंक खाते क्रमांक | ------------------------------------------------ |
| ४. बॅंक IFSC code | ------------------------------------------------ |

दिनांक - / /२०१८
ठिकाण -

निविदाधारकाची सही व शिक्का



Scanned with CamScanner

## अ) Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/मार्केट यार्ड लायसेन्स/
स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/उत्पादक संस्थेचा दाखला/तत्सम परवाना
(उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका)

२. GST नोंदणी दाखला/GST Online Registration Acknowledgement

३. पॅन कार्ड

४. वार्षिक उलाढालीबाबतचे चार्टर्ड अकाऊंटन्ट यांचे प्रमाणपत्र

५. अन्न आणि औषध प्रशासन नोंदणी परवाना
(FSSA परवाना आवश्यकतेनुसार)

**ब) साखर नमुना पिशवी**

दिनांक - / /२०१८

ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**



Scanned with CamScanner

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय – सन २०१८-१९ (माहे जुलै-२०१८ ते मार्च-२०१९) करिता लाडू निर्मिती व कॅन्टीन विभागांसाठी साखर पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या मालाचा, आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर मालाचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त मालाची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

नियमाप्रमाणे बयाणा रक्कम भरलेली आहे.

ज्या मालाच्या निविदा मंजुर होतील, त्या मान्य दराने मालाचा पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर मालाच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख भरणा करु. याकरीता बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत नमुन्याप्रमाणे माल वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०१८
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

**फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव** **सही/सहया व शिक्का**

(१) -----------------------------------

(२) -----------------------------------

**सोबत- कागदपत्रे**



Scanned with CamScanner

# वार्षीक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------ यांचे व्यवसायाची सन २०१६-१७ ची वार्षीक उलाढाल रु. --------------------------- आहे.

दिनांक :- / /२०१८

लेखापरीक्षक/चार्टर्ड अकाऊंटंट
(सही व शिक्का)

नोंदणी क्रमांक.



Scanned with CamScanner

B.O.Q-1

**(A) Requirement of Sugar for the Period of July-2018 to September-2018**

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Per Quintal | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Sugar (Sakhar) - M-30 | 5,150 | Quintal | | |

**(Smt. Rubal Agarwal, I.A.S.)**
**CHIEF EXECUTIVE OFFICER**
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

10/05

Scanned with CamScanner

B.O.Q. 2

**(B) Requirement of Sugar for the Period of October-2018 to December-2018**

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Per Quintal | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Sugar (Sakhar) - M-30 | 5,150 | Quintal | | |

**(Smt.Rubal Agarwal, I.A.S.)**
**CHIEF EXECUTIVE OFFICER**
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

Scanned with CamScanner

B.O.Q. 3

**(C) Requirement of Sugar for the Period of January-2019 to March-2019**

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Per Quintal | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Sugar (Sakhar) - M-30 | 5,150 | Quintal | | |

10/05

**(Smt.Rubal Agarwal, I.A.S.)**
**CHIEF EXECUTIVE OFFICER**
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

Scanned with CamScanner